**आधार पत्राची प्रत छापण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः MH-९०७/७६२०१३-DIR-DIT(MH)/३९**
मंत्रालय (विस्तार इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४००० ०३२
तारीख: २० सप्टेंबर, २०१३

**शासन निर्णय**

**वाचा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: मातंस/२०१२/प्र.क्र. /३९, दि.५/१२/२०१२**

**प्रस्तावना :**

आधार योजना देशभरात राबवली जात आहे. ही योजना राबविण्यामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. देशात सर्वाधिक आधारची नोंदणी आणि आधार क्रमांकांची निर्मिती महाराष्ट्र राज्यात झालेली आहे. तथापि, बहुतेक रहिवाशांना आधार ओळखपत्र प्रत्यक्षात प्राप्त झालेली नाहीत. याकरिता विशिष्ट ओळखपत्र प्राधिकरणा(UIDAI)ने eaadhaar.uidai.gov.in या नांवाचे पोर्टल सुरु केलेले असून त्याद्वारे रहिवाशांना आधार ओळखपत्राची प्रत छापून घेता येते. ही प्रत विशिष्ट ओळखपत्र प्राधिकरणाकडून डिजिटली स्वाक्षरीत असून त्याचा उपयोग आधार ओळखपत्र प्रत्यक्ष प्राप्त होईपर्यंत रहिवाशांना करता येईल. सदर पोर्टलवर लॉगईन करुन आधार पत्राची प्रत छापून घेण्याची सुविधा वरील दिनांक ५/१२/२०१२ च्या शासन निर्णयानुसार उपलब्ध करुन देण्यात आलेली होती व सदर शासन निर्णयानुसार ज्या रहिवाशांकडे इंटरनेट सुविधा, प्रिंटर्स इत्यादि उपलब्ध नाही अशा रहिवाशांकरीता महा-ई-सेवा केंद्र, सेतु सुविधा केंद्र, संग्राम केंद्र यांच्यामार्फत रु.२/- (रुपये दोन फक्त) इतके शुल्क अदा करुन आधारपत्राची प्रत मिळविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. आता सदर शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे

**शासन निर्णय:**

ज्या रहिवाशांकडे इंटरनेट सुविधा, प्रिंटर्स इत्यादि उपलब्ध नाही अशा रहिवाशांकरीता महा-ई-सेवा केंद्र, सेतु सुविधा केंद्र, संग्राम केंद्र यांच्याकडून आधार पत्र छापून देण्याकरिता खालीलप्रमाणे सुधारीत दर ठरवून देण्यात येत आहेत.

(१) आधार पत्राची साधी प्रत (Black & White) रु. ५/- (रुपये पाच फक्त)

(२) आधार पत्राची रंगीत प्रत रु. १५/- (रुपये पंधरा फक्त)

शासन असाही आदेश देत आहे की, गॅस एजन्सीजकडे आधार क्रमांक गॅस क्रमांकाशी संलग्न करण्याकरिता येणाऱ्या ज्या ग्राहकांना आधार पत्राची प्रत छापून देण्यात येईल अशा ग्राहकांनादेखील गॅस एजन्सीज आधार पत्राच्या छपाईसाठी सदर दर आकारु शकतात. तथापि, ज्या रहिवाशांच्या आधार

क्रमांकाची निर्मिती झालेली नसेल किंवा ज्यांना आधार पत्राच्या छापील प्रतीची आवश्यकता नसेल त्यांना कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९२०१६५१२७४३११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chavan Pradip Girdhar

Digitally signed by Chavan Pradip Girdhar
DN: c=IN, o=Govt. of Maharashtra, ou=Directorate of Information Technology, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Chavan Pradip Girdhar
Date: 2013.09.20 17:15:53 +05'30'

**प्रदीप चव्हाण**
**कार्यासन अधिकारी**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. सर्व विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
१०. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व मंडळे, महामंडळे,प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या इत्यादी.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिद्धीकरीता ५ प्रती)
१२. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६ वा मजला, विधान भवन, मुंबई
१३. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
१४. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१७. सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
१८. सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),

१९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई
२१. महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
२२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर
२३. अधिदान व लेख अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. मुख लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२६. सर्व विभागीय आयुक्त,
२७. सर्व जिल्हाधिकारी,
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२९. सा.प्र.वि. कार्यासन-३९
३०. सर्व मंत्रालयीन विभाग,